डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

नाट्यशास्त्र विभाग

वृत्त प्रकाशनार्थ

**41 व्या एकांकिका महोत्सवाचे उद्‌घाटन संपन्न**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाअंतर्गत दि. 15 जाने. ते 25 जाने. 2016 दरम्यान एकांकिका महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवायचे उद्‌घाटन विभागाचे माजी विद्यार्थी व प्रसिद्ध अभिनेते मा.संजय सुगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. शशिकांत ब-हाणपूरकर यांची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना मा. संजय सुगावकर म्हणाले की, रंगभूमीवर आपली छाप निर्माण करण्यासाठी कलावतांनी मेहनत केली पाहिजे. नाट्यशास्त्र विभागातून चांगले कलावंत घडावे आणि नाहीच घडले तर निदान चांगले प्रेषक घडावे एवढी माफक अपेक्षा त्यांनी विद्यार्थ्यांकडून केली.

कलाक्षेत्रात कुणी पहिल्याच प्रयत्नात स्टार होतो, तर कुणी आयुष्यभरही स्टार होत नाही.म्हणून या क्षेत्राकडे फार ठोळसपणे पाहण्याची विद्यार्थ्यांना दृष्टी दिली. तसेच नाट्यशास्त्र हा व्यक्तीमत्व विकासासाठी फार महत्वाचा विषय असल्यामुळे तो शासनाने माध्यमिक शाळेपासूनच सुरु करावा अशी आशा व्यक्त केली.

या प्रसंगी नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. शशिकांत ब-हाणपूरकर म्हणाले की, काही विद्यार्थ्यांनी स्वत: लिहलेल्या एकांकिकेचे सादरीकरण होण्यासाठी व त्यांना त्यांच्या लिखाणातील व दिग्दर्शनातील उणीवा भरुन काढण्याची संधी प्राप्त व्हावी यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त जर इच्छुक विद्यार्थ्यांना एकांकिका सादरीकरण करण्याची इच्छा असेल तर त्यालाही एकांकिका महोत्सवात सादरीकरण करण्याची संधी देणार आहोत. मात्र अभ्यासक्रम पूर्ण करत करत हा एकांकिका महोत्सव आर्थिक मदतीशिवाय नाट्यकलेचे पाईक होवून विद्यार्थी करणार आहेत. हे अभिनंदनीय आहे असे ते म्हणाले.

उद्‌घाटनानंतर प्रविण पाटेकर लिखित व संदीप कणके दिग्दर्शित कॉमन लाईफ एकांकिकेचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमास डॉ. जयंत शेवतेकर, डॉ. अशोक बंडगर प्रा. स्मिता साबळे, प्रा. गजानन दांडगे, श्री. रामदास ठोके, प्रा. सुमेध साळवे, प्रा.गणेश शिंदे, प्रा. विशाखा शिरवाडकर यांच्यासह अनेक कर्मचारी वृंद व रसिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार नाट्यनिर्देशक श्री. सुनिल टाक यांनी मानले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
नाट्यशास्त्र विभाग
वृत्त प्रकाशनार्थ

## नाट्यशास्त्र विभागात प्रि.पिएच.डी कोर्स वर्क चे उद्‌घाटन संपन्न

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नाट्यशास्त्र विभागाअंतर्गत नाट्यशास्त्र प्रि. पिएच.डी कोर्स वर्क दि. 15 जाने. 2016 ते 04 फेब्रुवारी 2016 दरम्यान आयोजित केला आहे. या कोर्सचे चे उद्‌घाटन मा. प्रोफेसर डॉ. ए.जी.खान, संचालक, डॉ. रफीक झकारीया सेंटर फॉर हायर लर्निग ॲन्ड रिसर्च यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपिठावर मा. दोस्त महमद खान नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. शशिकांत ब-हाणपूरकर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. डॉ. ए.जी.खान म्हणाले की, संशोधनातील मुल्य टिकविण्यासाठी संशोधन हे चिकाटीने करणे फार महत्वाचे ठरते. त्यातले त्यात संगीत,नृत्य,नाट्य,शिल्प याविषयातील संशोधन हे फिल्ड वर्क संशोधन असल्यामुळे ते खुप मुल्यवान व चिरकाल टिकणारे संशोधन असते.

यावेळी प्रा.डॉ. शशिकांत ब-हाणपूरकर म्हणाले की, २१ दिवस चालणा-या या कोर्स मधून विद्यार्थ्यांच्या संशोधनास गती प्राप्त होईल व संशोधनातील तांत्रिक घटकांचा अभ्यास होवून प्रक्रिया पूर्ण होण्यास संशोधकास मदत होईल असे म्हणाले. या पिएच.डी कोर्सवर्कसाठी डॉ. रुस्तूम अचलखांब, डॉ. मुस्तजिब खान, डॉ. जयंत शेवतेकर, डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. संजय पाटील देवळाणकर, डॉ. चंद्रशेखर कणसे, डॉ. अशोक बंडगर, डॉ. वैशाली बोदेले, डॉ. धर्मराज वीर, डॉ. भारती गवळी, यांचे मार्गदर्शन लाभणार आहेत. या कार्यक्रमास डॉ. जयंत शेवतेकर, प्रा.स्मिता साबळे यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नाट्यनिर्देशक श्री. सुनिल टाक यांनी केले तर आभार योगिता तळेकर यांनी मानले.

# 41st One Act Play (2016-17)

